**ठळक बातम्या**

- हे युग युद्धाचं युग नसून प्रत्येक समस्येचं निराकरण हे युद्धातून शक्य नाही, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं पूर्व आशिया शिखर परिषदेत प्रतिपादन

- वर्ष २०१६-१७ ते २०२१-२२ या आर्थिक वर्षात ग्रामीण कुटुंबांचं सरासरी मासिक उत्पन्न ५७ टक्क्यांनी वाढल्याची नाबार्डच्या सर्वेक्षणात माहिती

- नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या धावपट्टीची चाचणी घेण्यासाठी हवाई दलाचं विमान धावपट्टीवर उतरलं

**आणि**

- महाराष्ट्रात नाशिकमध्ये तोफगोळ्याचा स्फोट होऊन दोन अग्निवीरांचा मृत्यू

**<><><><><>**

हे युग युद्धाचं युग नसून प्रत्येक समस्येचं निराकरण हे युद्धातून शक्य नाही. युरेशिया आणि पश्चिम आशिया प्रदेशात शांतता प्रस्थापित व्हावी, अशी प्रत्येकाची इच्छा असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. लाओसच्या व्हिएन्तिआन इथं झालेल्या एकोणिसाव्या पूर्व आशिया शिखर परिषदेत आज ते बोलत होते. जगाच्या विविध भागात सुरू असलेल्या संघर्षाचा ग्लोबल साउथ देशांवर होणाऱ्या परिणामांविषयीही त्यांनी चिंता व्यक्त केली. दहशतवाद हे जागतिक शांतता आणि सुरक्षेसाठी एक आव्हान असल्याचं सांगत प्रधानमंत्र्यांनी दहशतवादाविरुद्ध एकत्रितपणे काम करण्यावर भर दिला. हिंद-प्रशांत प्रदेशाच्या शांतता तसंच प्रगतीसाठी एक सर्वसमावेशक, मुक्त, समृद्ध आणि शिस्तबद्ध वातावरण आवश्यक आहे, असंही प्रधानमंत्री म्हणाले. तसंच, यागी वादळामुळे बळी पडलेल्यांप्रतिही त्यांनी शोक व्यक्त केला.

**<><><><>**

भारत-आसियान राष्ट्रांनी आंतरराष्ट्रीय कायद्याच्या सार्वत्रिक मान्यताप्राप्त तत्वांनुसार सर्वसमावेशक भागीदारी मजबूत करण्याच्या दृष्टीनं संयुक्त निवेदन जारी केलं आहे. या निवेदनात सागरी सुरक्षा, दहशतवादाला विरोध, सायबर सुरक्षा, आंतरराष्ट्रीय गुन्हे, संरक्षण उद्योग, मानवतेच्या दृष्टीने परस्पर सहकार्य करायला सहमती दर्शवली आहे.

**<><><><>**

आर्मी कमांटर कॉन्फरन्समध्ये सहभागी होण्यासाठी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह सिक्कीमची राजधानी गंगटोक इथं दोन दिवसांच्या दौऱ्यावर जात आहेत.  या परिषदेत धोरणात्मक बाबी आणि संरक्षण सिद्धतेवर चर्चा केली जाणार आहे. या दौऱ्यात संरक्षण मंत्री रस्ते प्रकल्प, प्रेरणा स्थळाचं उद्घाटन करतील. तसंच ऑक्टोबर २०२३ मध्ये हिमनदी सरोवर फुटून झालेल्या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या २२ जवानांच्या स्मारकाचं अनावरणही करणार आहेत.

**<><><><>**

वर्ष २०१६-१७ ते २०२१-२२ या आर्थिक वर्षात ग्रामीण कुटुंबांचं सरासरी मासिक उत्पन्न ५७ टक्क्यांनी वाढल्याचं नाबार्डच्या सर्वेक्षणात नमूद करण्यात आलं आहे. वर्ष २०१६-१७ मध्ये ग्रामीण कुटुंबांचं सरासरी मासिक उत्पन्न ८ हजार ५९ रुपये होतं; २०२१-२२ मध्ये  ते १२ हजार ६९८ रुपयांपर्यंत वाढलं आहे. ग्रामीण भागातल्या कुटुंबांचा मासिक खर्चही ६ हजार ६०० रुपयांवरून ११ हजार २०० रुपयांवर गेला आहे; तसंच या कुटुंबांकडून होणारी आर्थिक बचतही वाढली आहे.

देशातल्या ग्रामीण कुटुंबांमध्ये विमा सुरक्षेतही लक्षणीय वाढ झाल्याचं या सर्वेक्षणात म्हटलं आहे. सर्वेक्षणाच्या आकडेवारीनुसार, किमान एक सदस्य विमा धारक असलेल्या कुटुंबांचं प्रमाण २५ टक्क्यांवरून ८० टक्क्यांच्या वर गेलं आहे.

ग्रामीण भागात किसान क्रेडिट कार्ड महत्त्वाचं ठरत असून पेन्शन धारक कुटुंबांची संख्या १९ टक्क्यांवरून साडे तेवीस टक्के झाली आहे. दरम्यान, थकीत कर्ज असलेल्या कुटुंबांचं प्रमाणही वर्ष २०१६-१७ मधल्या ४७ टक्क्यांवरून २०२१-२२ मध्ये ५२ टक्क्यांपर्यंत वाढलं आहे.

<><><><><>

आज दुर्गा अष्टमी आहे. देशाच्या विविध भागांमध्ये, विशेषत: पूर्व भागात दुर्गापूजेचा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. आजच्या दिवशी दुर्गा देवीच्या नऊ रूपांची पूजा केली जाते. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज दुर्गापूजेच्या निमित्तानं देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. दुर्गादेवी शक्तीचं प्रतीक आहे, वाईट शक्तींवर चांगल्या शक्तींचा विजय म्हणून दुर्गापूजा साजरी केली जाते, असं राष्ट्रपती मुर्मू यांनी  समाजमाध्यमावरल्या आपल्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

स्वातंत्र्यसैनिक, लोकनायक जयप्रकाश नारायण यांची जयंती आज देशाच्या विविध भागात साजरी होत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरल्या पोस्टद्वारे जयप्रकाश यांना अभिवादन केलं. जयप्रकाश नारायण यांनी समाज आणि देशासाठी दिलेल्या योगदानाची आठवण प्रधानमंत्र्यांनी केली. जयप्रकाश यांचे विचार अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरतील, असं प्रधानमंत्री म्हणाले.

<><><><><>

जगभरात आज आंतरराष्ट्रीय बालिका दिन साजरा करण्यात येत आहे. लैंगिक समानता, लैंगिक शिक्षण आणि मुलींसाठी समान संधी यांचं महत्त्व अधोरेखित करणं हा या दिवसाचा उद्देश आहे. या वर्षी या दिवसाची मध्यवर्ती संकल्पना भविष्यासाठी बालिकांचा दृष्टिकोन हा आहे.

<><><><><>

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या धावपट्टीची चाचणी घेण्यासाठी हवाई दलाचं सी -२९५ हे विमान प्रत्यक्ष धावपट्टीवर उतरवण्यात आलं. भारतीय विमानतळ प्राधिकरणाने विमानतळावरील इन्स्ट्रुमेंट लँडिंग सिस्टीमच्या चाचण्या पूर्ण केल्यानंतर आज धावपट्टीची चाचणी करण्यात आली. यावेळी केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, सिडकोचे उपाध्यक्ष विजय सिंघल उपस्थित होते.

**<><><><><>**

नाशिकच्या देवळाली कॅम्प इथे आर्टिलरी फिल्ड फायरिंग रेंजमध्ये तोफ चालवण्याचा सराव सुरू असताना तोफगोळ्याचा स्फोट होऊन दोन अग्निवीरांचा मृत्यू झाला आहे तर अन्य एक अग्निवीर जखमी झाला आहे. गोहिल विश्वराज सिंग आणि सैफत शित असं या मृत पावलेल्या अग्निवीरांची नावं आहेत. देवळाली कॅम्पमध्ये तोफेचा सराव सुरू असताना तोफेजवळच गोळ्याचा स्फोट झाला आणि त्याचे तुकडे अग्निवीरांच्या शरीरात घुसल्याने ते गंभीर जखमी झाले. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं. तिथे उपचारांदरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

**<><><><><>**

नागपूरातील पवित्र दीक्षाभूमीवर आज दीक्षाभूमी स्मारक समितीचे सदस्य आणि समता सैनिक दल यांच्या उपस्थितीत भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई यांच्या नेतृत्वाखाली पंचशिल ध्वजारोहण करण्यात आलं. यावेळी समता सैनिक दलाचे जवान, बौद्ध अनुयायी उपस्थित होते.

उद्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा मुख्य सोहळा सायंकाळी साजरा केला जाणार असल्यानं दीक्षाभूमीवर आजपासूनच हजारों बौद्ध अनुयायी दाखल होऊ लागले आहेत. बौद्ध अनुयायांना प्रशासनातर्फे विविध आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या असून धम्मचक्र प्रवर्तन दिनाची जय्यत तयारी प्रशासनानं केली आहे.

**<><><><><>**

कोलकातामधल्या आर.जी. कार रुग्णालय इथं बेमुदत उपोषणात सहभागी झालेल्या सात कनिष्ठ डॉक्टरांपैकी एकाची प्रकृती काल रात्री बिघडल्याने त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आलं. काल रात्री त्याची प्रकृती गंभीर झाल्यानंतर त्याला अतिदक्षता विभागात हलवण्यात आलं. दरम्यान शनिवारी संध्याकाळपासून विविध वैद्यकीय महाविद्यालये आणि रुग्णालयातल्या सहा कनिष्ठ डॉक्टरांनी बेमुदत उपोषण सुरू केलं आहे.

<><><><>

दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकानं दोन हजार कोटी रुपये किमतीचं २०० किलो कोकेन जप्त केलं आहे. पश्चिम दिल्लीतल्या रमेश नगर परिसरातून हे कोकेन जप्त करण्यात आल्याची माहिती दिल्ली पोलिसांच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्यानं दिली. दिल्ली पोलिसांनी गेल्या आठवड्यात ५०० किलो कोकेन जप्त केलं होतं. पोलिसांनी या सर्व प्रकरणात आतापर्यंत ७ आरोपींना अटक केली आहे.

<><><><>

श्रीलंकेत येत्या १४ नोव्हेंबर रोजी सार्वत्रिक निवडणुका होत असून त्यासाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत आज दुपारपर्यंत संपेल. श्रीलंकेच्या निवडणूक आयोगानं दिलेल्या माहितीनुसार एकूण ३३ स्वतंत्र गट आणि राजकीय पक्षांनी या निवडणुकीसाठी अर्ज दाखल केले आहेत. १४ नोव्हेंबर रोजी श्रीलंकेचे मतदार जिल्हा पातळीवर १९६ उमेदवारांचं आणि राष्ट्रीय पातळीवर २९ उमेदवारांचं भविष्य ठरवणार आहेत.

<><><><>

इस्त्रायलने गाझा पट्टी आणि लेबनॉनमध्ये केलेल्या हवाई हल्ल्यामध्ये अनेक जणांचा मृत्यू झाला आहे. यात गाझा पट्टीतल्या विस्थापितांनी आश्रय घेतलेल्या शाळेचा समावेश असून या हल्ल्यात २८ ठार तर ५४ जण जखमी आहेत. बैरुतमध्ये झालेल्या हल्ल्यात २२ जणांचा मृत्यू झाला तर ११७ जण खमी झाले.

तसंच, या हवाई हल्ल्यात अन्नधान्याची साठवणूक केलेली शाळाही नष्ट झाली आहे.

**<><><><><>**

आयसीसी महिला टी २० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज दुबईत संध्याकाळी साडेसात वाजता ऑस्ट्रेलिया आणि पाकिस्तान संघादरम्यान सामना खेळला जाणार आहे.

काल शारजा इथं झालेल्या सामन्यात वेस्ट इंडिजनं बांगलादेशाचा आठ गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करत बांगलादेशनं २० षटकांत ८ खेळाडूंच्या बदल्यात १०३ धावा केल्या. बांगलादेशकडून कर्णधार निगार सुलताना हिनं ४४ चेंडूत ३९ धावा केल्या.

दरम्यान, भारतीय संघाची लढत १३ ऑक्टोबरला ऑस्ट्रेलियाशी होणार आहे. अंतिम फेरीतील चार संघांत स्थान मिळवण्यासाठी भारतीय संघाला हा सामना जिंकणं आवश्यक आहे.

**<><><><><>**

स्पेनमध्ये सुरू असलेल्या व्हॅलेन्शिया खुल्या टेनिस स्पर्धेच्या पुरुष दुहेरीच्या उपांत्य फेरीत आज भारताच्या जीवन नेडुचांझियान आणि विजय सुंदर प्रशांत या जोडीचा सामना पोलंडच्या जोडीशी होणार आहे. उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात काल या जोडीनं प्रतिस्पर्धी जोडीवर ६-०, ६-२ अशी सहज मात केली होती.

///<><><><><>//